आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक  बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

१० सप्टेंबर २०२४ - मंगळवार

**ठळक बातम्या**

- जागतिक समस्यांवर स्थानिक उपाय शोधण्याची गरज असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन

- आगामी विधानसभा निवडणुकीसाठी भाजपाची व्यवस्थापन समिती स्थापन

- आगामी ईद-ए-मिलाद दरम्यान डीजे आणि प्रखर प्रकाशझोतांवर बंदीची मागणी करणाऱ्या याचिकेवर तातडीनं सुनावणी घ्यायला मुंबई उच्च न्यायालयाचा नकार

**आणि**

- पैठणच्या जायकवाडी धरणातून साडे नऊ हजार घनफूट प्रतिसेकंद वेगानं विसर्ग सुरु, भंडारा जिल्ह्याला पावसाचा रेड अलर्ट

<><><><><>

जागतिक समस्यांवर स्थानिक उपाय शोधण्याची गरज असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. त्यांनी आज, नवी दिल्ली इथं स्थापन केलेल्या अनुसंधान नॅशनल रिसर्च फाउंडेशनच्या, पहिल्या व्यवस्थापकीय बैठकीचं अध्यक्षपद भूषवलं, त्यावेळी ते बोलत होते. संशोधन परिसंस्थेच्या मार्गातले अडथळे ओळखून ते दूर करण्यासाठी योग्य पावलं उचलायला हवीत, असं आवाहन त्यांनी यावेळी केलं. संशोधनामध्ये

सध्याच्या आव्हानांवर नवीन उपाय शोधण्यावर भर द्यायला हवा असं ते म्हणाले.

संस्थांचं श्रेणीकरण आणि मानकीकरणावर भर देत, विकासाच्या प्रगतीचा मागोवा घेण्यासाठी विविध क्षेत्रातल्या तज्ञांची यादी आणि डॅशबोर्ड विकसित करायला हवा असं प्रधानमंत्री म्हणाले. संशोधन कार्यात साधन संपत्तीची कमतरता भासणार नाही, यावर वैज्ञानिक समुदायानं विश्वास ठेवायला हवा असं आवाहन त्यांनी केलं. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या शिफारसीनुसार अनुसंधान नॅशनल रिसर्च फाउंडेशनची स्थापना करण्यात आली आहे. देशातली विद्यापीठं, महाविद्यालयं, संशोधन संस्था आणि संशोधन आणि विकास प्रयोगशाळांमध्ये संशोधन आणि नवोन्मेष संस्कृतीला चालना देणं, हे याचं उद्दिष्ट आहे. देशातल्या वैज्ञानिक संशोधनाला उच्च स्तरीय धोरणात्मक दिशा देणारी सर्वोच्च संस्था म्हणून ती काम करेल.

**<><><><><>**

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना सक्षम करण्यासाठी राज्यभरात लाभार्थी कुटुंब भेट अभियानाची सुरुवात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज केली. राज्यात महायुतीला विजयी करण्यासाठी शिवसेनेचा प्रत्येक कार्यकर्ता दररोज १५ कुटुंबांची भेट घेऊन त्यांना या योजनेचा लाभ मिळाला आहे की नाही, हे तपासून तो मिळालेला नसल्यास याबाबतच्या अडचणी दूर करेल,

त्या कुटुंबाला मार्गदर्शन करेल, माहिती देईल, असं शिंदे यांनी ठाण्यात वार्ताहरांशी बोलताना सांगितलं.

**<><><><><>**

आगामी विधानसभा निवडणुकीसाठी भाजपानं व्यवस्थापन समिती स्थापन केली आहे. तीन सहसंयोजक, विविध स्तरांवरच्या समित्यांचे प्रमुख, विशेष आमंत्रित आणि पदसिद्ध सदस्यांचा यात समावेश असल्याची माहिती माजी केंद्रीय राज्यमंत्री आणि समितीचे अध्यक्ष रावसाहेब दानवे यांनी दिली. बूथ पर्यंतची यंत्रणा सक्षम करण्यासाठी पक्षातर्फे ही व्यवस्थापन समिती तयार केल्याचं ते म्हणाले. जाहीरनामा समितीचं प्रमुखपद सुधीर मुनगंटीवार यांच्याकडे देण्यात आलं असून प्रचार यंत्रणा रवींद्र चव्हाण यांच्या नेतृत्त्वाखाली असेल. महायुती निवडणूक अभियान समन्वयक म्हणून गिरीश महाजन काम पाहणार आहेत. विशेष आमंत्रित म्हणून नितीन गडकरी, चंद्रशेखर बावनकुळे, देवेंद्र फडनवीस, पीयूष गोयल, विनोद तावडे, आशिष शेलार, नारायण राणे यांच्यासह पक्षाचे अन्य नेते या समितीमध्ये असतील.

**<><><><><>**

मुंबईत आज भारत-संयुक्त अरब अमिराती यांच्यात बिझनेस फोरमचं आयोजन करण्यात आलं होतं. अबुधाबीचे युवराज शेख खालेद बिन मोहम्मद बिन झायेद अल नाहयान आणि आणि केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पियूष गोयल यांनी याचं अध्यक्षपद संयुक्तपणे भूषवलं. भारत आणि संयुक्त अरब अमिराती यांच्यातले संबंध हेवा वाटावे असे आहेत, असं

प्रतिपादन केंद्रीय मंत्री पियूष गोयल यांनी केलं. यूएई हा भारताच्या प्रगतीतला महत्वाचा भागीदार आहे, दोन्ही देशांमधल्या देवाणघेवाणीत विकसित भारताचं उद्दिष्ट सामाववलेलं आहे, असंही ते म्हणाले.

या फोरममध्ये भारत आणि संयुक्त अरब अमिराती यांच्यात दहा करार करण्यात आले. यात जैविक शेती, प्रक्रिया केलेल्या अन्नाची आयात, लघु आणि सूक्ष्म उद्योगांना चालना आदी करारांचा समावेश आहे.

**<><><><><>**

आगामी विधानसभा निवडणुकीत रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाला योग्य ते प्रतिनिधित्व मिळेल, अशी अपेक्षा पक्षाचे अध्यक्ष, केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी व्यक्त केली आहे. ते आज पुण्यात वार्ताहर परिषदेत बोलत होते. लोकसभा निवडणुकीत एनडीएला अपेक्षित यश मिळालं नसलं, तरी विधानसभेला आम्हाला योग्य प्रतिनिधित्व मिळालं तर त्याचा फायदा महायुतीला निश्चित होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. विधानसभा निवडणुकीसाठी रिपाइनं १२ जागांची मागणी केली आहे. रिपाइंमुळे महायुतीतल्या तीनही प्रमुख पक्षांना चांगला फायदा होणार असल्यानं त्यांनी ही मागणी पूर्ण करावी, असं आठवले म्हणाले.

**<><><><><>**

**राज्यात** ठिकठिकाणी गणेशोत्सव उत्साहाने साजरा होत आहे. सांगली जिल्ह्यातल्या ७९ गावांनी एक गाव एक गणपती ही संकल्पना राबवली आहे. कोकणात गणेशोत्सवाचं भजन संस्कृतीशी अतूट नातं आहे. ही बाब लक्षात

घेऊन गेल्यावर्षीपासून सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेच्या वतीने भजन साहित्याचं वाटप केलं जात आहे. यंदाही अनेक भजनी मंडळांना भजन साहित्याचं वाटप झालं. तर **ठाणे** जिल्ह्यात शासकीय योजनांच्या प्रसिद्धीसाठी विहंग गार्डन गणेशोत्सव सांस्कृतिक मंडळात मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचे फलक लावले आहेत.

श्रोते हो, पुण्यातून सुरू झालेला सार्वजनिक गणेशोत्सव आता आंतरराष्ट्रीय झाला आहे. विविध देशात गणेशोत्सव कशा पद्धतीनं साजरा होतो हे आपण तिथे राहणाऱ्या नागरिकांकडून जाणून घेत आहोत.

आकाशवाणी मुंबईवरून रात्री ८ वाजून ५ मिनिटांनी प्रसारित होणाऱ्या राष्ट्रीय बातम्यांमध्ये आज आपण अमेरिकेमधल्या गणेशोत्सवाची माहिती ऐकू शकाल.

**<><><><><>**

आगामी ईद-ए-मिलाद दरम्यान डीजे आणि प्रखर प्रकाशझोतांवर बंदी घालण्याची मागणी करणाऱ्या जनहित याचिकेवर तातडीनं सुनावणी घ्यायला मुंबई उच्च न्यायालयानं आज नकार दिला. मुख्य न्यायमूर्ती देवेंद्र कुमार उपाध्याय आणि न्यायमूर्ती अमित बोरकर यांच्या खंडपीठासमोर ही सुनावणी झाली. राष्ट्रीय हरित लवादानं याआधीच गणेशोत्सवाच्या काळात डीजे आणि प्रखर प्रकाशझोतांवर बंदी घातलेली आहे, त्यामुळे न्यायालयाने या जनहित याचिकेचा विचार करावा, अशी विनंती याचिकाकर्त्यांच्या वकिलानं केली, मात्र, यावर बंदी हरित लवादानं घातली असेल, तर ईदच्या

काळात बंदी घालण्याची मागणीही हरित लवादासमोरच करावी, असं उत्तर मुख्य न्यायमूर्ती उपाध्याय यांनी दिलं आणि ही सुनावणी पुढे ढकलायची सूचना केली.

**<><><><><>**

**छत्रपती संभाजीनगर** जिल्ह्यात पैठण इथल्या जायकवाडी धरणाचे आणखी सहा दरवाजे आज दुपारी उघडण्यात आले. आता धरणाचे १८ दरवाजे अर्ध्या फुटाने उचलून सुमारे साडे नऊ हजार घनफूट प्रतिसेकंद वेगाने पाणी गोदावरी नदीपात्रात सोडण्यात येत आहे.

**भंडारा** जिल्ह्यात काल रात्रीपासून संततधार पावसामुळे वैनगंगा नदी दुथडी भरून वाहत आहे. त्यामुळे गोसीखुर्द धरणाच्या पाणीपातळीत वाढ झाल्यानं धरणाच्या ३३ दरवाज्यांपैकी २५ दरवाजे अर्ध्या मीटरनं उघडले आहेत. नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा दिला आहे. संततधार पाऊस कायम राहिला तर आणखी पाणी सोडलं जाईल असं जिल्हा प्रशासनानं सांगितलं आहे. हवामान विभागानं भंडारा जिल्ह्याला रेड अलर्ट दिला असून उद्या, जिल्ह्यातल्या सर्व शाळा आणि महाविद्यालयांना सुट्टी जाहीर झाली आहे.

**गोंदिया** जिल्ह्यात काल रात्री ढगफुटी सारखा पाऊस पडल्यामुळे जिल्ह्यात पूर परिस्थिती निर्माण झाली आहे. गोंदिया शहरातून वाहणाऱ्या नाल्यालगतचं घर पाण्यात कोसळून एकाचा मृत्यू झाला. गोंदिया जिल्ह्यात सूर्याटोला भागाला बांध तलाव ओसंडून वाहू लागल्यामुळे अनेक घरात पाणी शिरलं आहे

तर ग्रामीण भागात नदी नाले ओसंडून वाहू लागले असून, आणि अनेक गावांचा संपर्क तुटला आहे.

<><><><><>

एनआयए, अर्थात राष्ट्रीय तपास संस्थेनं आज लाओस इथल्या लॉन्ग चेंग कंपनीच्या सीईओ विरोधात आंतरराष्ट्रीय स्तरावरची मानवी तस्करी आणि सायबर फसवणूक प्रकरणी आरोपपत्र दाखल केलं. एनआयए मुंबईनं या वर्षी अटक केलेला सुदर्शन दराडे, या प्रकरणातला प्रमुख आरोपी आहे. एनआयए नं दराडे याच्या मोबाईल मधून मोठ्या प्रमाणात गुन्हेगारी स्वरूपाचं साहित्य जप्त केलं असून या प्रकरणातल्या आणखी दोन फरार आरोपींबाबतचे तपशील  गोळा केले आहेत. यात एका परदेशी नागरिकाचा समावेश आहे. दराडे याच्या  लाओस मधल्या  लॉन्ग चेंग या कंपनीच्या माध्यमातून तरुणांना नोकरीचं अमिश दाखवून त्यांची फसवणूक केली जात होती असं तपासामधून उघड झालं आहे.

<><><><><>

शिवसेनेचे ज्येष्ठ नेते आणि माजी आमदार विजय अर्थात अप्पा साळवी यांचं काल रात्री रत्नागिरीतल्या खासगी रुग्णालयात वृध्दापकाळानं निधन झालं. ते ९५ वर्षांचे होते. रत्नागिरी जिल्ह्यात शिवसेना रुजवण्यात आणि वाढवण्यात त्यांचा सिंहाचा वाटा होता. आज सायंकाळी त्यांच्यावर अंत्यसंस्कार झाले.

१९९०च्या दरम्यान त्यांनी शिवसेनेचे जिल्हाप्रमुख म्हणून जबाबदारी निभावली होती. १९९५ ते १९९९ या काळात त्यांनी आमदार म्हणून, राजापूर विधानसभा मतदारसंघाचं प्रतिनिधित्व केलं होत. विविध शासकीय समित्यांमध्ये, तसंच अनेक सामाजिक संस्थांच्या कार्यात त्यांचा सक्रिय सहभाग होता. अभ्यासू भाषणं करणारा नेता अशी त्यांची ओळख होती.

**<><><><><>**

धुळे जिल्ह्यात निर्माण होत असलेल्या जामफळ धरणावरून शिंदखेडा तालुक्यातल्या ५४ गावांना शेतीसाठी थेट पाणीपुरवठा करणार्या  'बंदिस्त नलिका वितरण प्रणाली' योजनेचं भूमीपूजन आज उपमुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांच्या हस्ते झालं. सहा राष्ट्रीय महामार्ग आणि मनमाड-इंदूर रेल्वे मार्गामुळे प्रवास आणि वाहतुकीची सोय, तसंच सुलवाडे-जामफळ-कनोली जल प्रकल्पामुळे सिंचनाची सोय उपलब्ध होत असल्यानं राज्यातल्या औद्योगिक केंद्रांमधे भविष्यात धुळ्याचाही समावेश होईल, असा विश्वास फडनवीस यांनी यावेळी व्यक्त केला.

**<><><><><>**

सिंधुदुर्गातल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळा पडल्याप्रकरणी मुर्तीकार जयदीप आपटे याची पोलिस कोठडी न्यायालयानं येत्या शुक्रवारपर्यंत वाढवली आहे. दुसरा आरोपी चेतन पाटील याला न्यायालयानं १५ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली आहे. दोघांची पोलीस कोठडी आज संपल्यानं दोघांना आज न्यायालयात हजर केलं होतं.

<><><><><>

भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या मुलाच्या मालकीच्या कारमुळे काल मध्यरात्री नागपुरात काही गाड्यांना झालेल्या अपघाताबाबत पोलीस योग्य तो तपास करत आहेत. पण केवळ बावनकुळे यांना अडकवण्यासाठी या गोष्टीचं राजकारण करणं योग्य नाही, असं उपमुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी म्हटलं आहे. ते आज नागपुरात बातमीदारांशी बोलत होते.

<><><><><>

येत्या दोन दिवसांत कोकणात आणि विदर्भात बहुतांश ठिकाणी, तर मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात काही ठिकाणी पावसाची शक्यता आहे. घाट परिसरात तुरळक ठिकाणी जोरदार पाऊस पडेल असा अंदाज आहे. विदर्भातल्या काही जिल्ह्यांमध्ये तुरळक ठिकाणी मेघगर्जनेसह मुसळधार पावसाची शक्यता असून, यावेळी सोसाट्याचे वारे वाहतील. असा पुणे वेधशाळेचा अंदाज आहे.

//<><><><><>//